0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचावे :-**

१) या कार्यालयाच्या दक्षता शाखेकडून दिनांक ०१/०४/२०१३ रोजी प्राप्त झालेला अहवाल.
२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२९/२०१३/जा.३०२ दिनांक ०५/०४/२०१३ व २९/०४/२०१३.
३) या कार्यालयाची "अंतरीम आदेश" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२९/२०१३/जा.३०३, दिनांक ०५/०४/२०१३.
४) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, बोरीवली पोलिस ठाणे, मुंबई यांचे दिनांक ०९/०५/२०१३ रोजीचे अभिवेदन.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२९/२०१३/जा. ४८१
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई - २०.
दिनांक :- ०७/०६/२०१३.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

## आदेश

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक १६/०३/२०१३ रोजी या कार्यालयास अधिकृत शिधावाटप दुकान क्रमांक ४३-ग-१७४ या दुकानातुन शासन अनुदानित गहू अवैधरीत्या खुल्या बाजारात काळ्याबाजाराने विक्री करणेकरीता पाठविला जात आहे अशा मिळालेल्या खबरीच्या अनुषंगाने या कार्यालयातील फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी व उपनियंत्रक शिधावाटप, ग परिमंडळ, कांदिवली यांचे अधिपत्याखालील अधिकारी/कर्मचारी यांचे पथक पंचांसह व कार्यालयीन संगणक व प्रिंटरसह आकाश प्रोव्हीजन एण्ड जनरल स्टोर, शॉप नं. १३, व्हिनस अपार्टमेंट, सिद्धीविनायक कॉम्पलेक्स, चिकूवाडी, शिंपोली, बोरिवली (प.), मुंबई ४०० ०९२ अधिकृत शिधावाटप दुकान क्रमांक ४३-ग-१७४ येथे सायंकाळी सुमारे ०४.४० वाजता पोहचले. तेथे या कार्यालयास खबर दिलेले खबरी हे त्यांचे काही सहकाऱ्यांसह सदर दुकानामध्ये उपस्थित होते. त्यांना अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष आपली ओळख करुन दिली.

सदर दुकानाच्या दर्शनी भागी आकाश प्रोव्हीजन एण्ड जनरल स्टोर, ४३-ग-१७४ असा फलक लावलेला असल्याचा आढळला. त्यानंतर पंचांसह अधिकाऱ्यांनी सदर दुकानात प्रवेश केला. त्यावेळी दुकानात एक इसम

बसलेला असल्याचे आढळले. त्यास अधिकाऱ्यांनी स्वत:ची ओळख करुन दिली व भेटीचे प्रयोजन सांगितले. अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष त्याला त्याचे नाव गांव विचारले असता, त्यांनी त्याचे नांव होरीलाल माणिकचंद जैस्वाल, राहणार पाटील चाळ, रुम नं. २ एक्सर रोड, बोरिवली (प.) असे सांगितले. अधिकृत शिधावाटप दुकान क्रमांक ४३-ग-१७४ हे श्रीमती शारदा अशोक जैस्वाल यांच्या मालकीचे असून, ती त्याची बहिण आहे. सदर दुकानात तो जवळपास ५ वर्षापासुन काम करीत असुन, दुकानाचा सर्व व्यवहार तो स्वत: पहात असल्याचे सांगितले आणि त्याचे नांवे नोकरनामाही तयार केलेला नाही असेही सांगितले.

त्यानंतर अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष खबरी यांचेकडे त्यांनी दिलेल्या खबरीच्या अनुषंगाने चौकशी केली असता, त्यांनी दुकानापासुन फर्लांगभर अंतरावर असलेल्या टेम्पो क्रमांक एमएच-४८-जी-२६०२ मध्ये सदर दुकानातील शासन अनुदानित गहू खुल्या बाजाराच्या पांढऱ्या रंगाच्या रिकाम्या गोण्यांमध्ये पलटी करुन तो भरुन खुल्या बाजारामध्ये विक्रीसाठी घेऊन जात असताना, त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी अडविल्याचे अधिकाऱ्यांना पंचांसमक्ष सांगितले. तसेच अधिकारी पंचांसमवेत दुकानात उपस्थित होईपर्यंत त्यांनी सदर दुकानाची संलग्न संस्था मे. सुरज ग्रेन डिलर्स वेलफेअर असोएिसशनचे प्रतिनिधी जय मार्केंडेय सिंग यांना दुकानात बोलावून घेतल्याचे अधिकाऱ्यांना आढळून आले. तद्नंतर अधिकाऱ्यांनी सदर टेम्पो क्रमांक एमएच-४८-जी-२६०२ ची पंचांसमक्ष पाहणी केली असता, टेम्पो चालक फरारी असल्याचे तथापी टेम्पो मागील व पुढील बाजूस खुला असल्याचे आढळले. मागील बाजून सदर टेम्पोला शटर होते. आतमध्ये खुल्या बाजाराच्या पांढऱ्या रंगाच्या गोण्यांमध्ये शिधाजिन्नसांचा साठा असल्याचे आढळुन आले. अधिकाऱ्यांनी सदर गोण्यांची टोचा मारुन तपासणी केली असता, आतमध्ये गव्हाचा साठा असल्याचे आढळले. अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष सदर साठ्याची मोजदाद केली असता, सरासरी ५० किलो भरतीच्या एकुण ५१ बाचकी असल्याचे आढळुन आले.

तद्नंतर अधिकाऱ्यांनी पुन्हा दुकानात उपस्थित होऊन, दुकानाची संपूर्ण तपासणी घेण्यास पंचांसमक्ष सुरुवात केली. अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष दुकानाची झाडाझडती घेतली असता, तपासणीवेळी दुकानात प्रत्यक्ष मोजणीवेळी ४५ लिटर्स केरोसीन व सरासरी ५० किलोच्या भरतीनुसार ८७ बाचक्यांमध्ये एकूण ४४५० किलो गहू आढळला. परंतु तांदळाचा साठा सदर अधिकृत शिधावाटप दुकानात आढळुन आला नाही. त्यानंतर अधिकाऱ्यांनी होरीलाल माणिकचंद जैस्वाल यांचेकडे प्राधिकारपत्र, स्टॉकबुक, भेट नोंदवही, पावती पुस्तक इ. ची मागणी केली व सदर दुकानाचे मालक शारदा अशोक जैस्वाल यांना बोलावून घेण्यास सांगितले. सदरच्या शिधाजिन्नसांपैकी केरोसीन वगळता इतर शिधाजिन्नसांचा प्रत्यक्ष साठा हा पुस्तकात नोंदविलेल्या साठ्यापेक्षा कमी असल्याचे तपासणीमध्ये निष्पन्न झाले.

CONTROLLER OF RATIONING ... HEAL ... MUI

सदर तपासणी सुरु असतानाच खबरी व त्यांचे सहकारी उपस्थित अधिकाऱ्यांना अवगत न करता व न सांगताच घटनास्थळावरुन निघुन गेले. त्यामुळे त्यांचा लेखी जबाब अधिकाऱ्यांना नोंदविता आला नाही.

दुकानाच्या तपासणीवेळी आढळुन आलेला शिधाजिन्नसांचा प्रत्यक्ष साठा व साठा पुस्तका नमूद असलेला शिधाजिन्नसांच्या साठ्याचा तपशिल खालील प्रमाणे,

| अ. क्र. | शिधाजिन्नसाचा प्रकार | प्रत्यक्ष मोजणीचेवेळी आढळलेला साठा | साठा पुस्तकात नोंदविलेला साठा | तफावत | दर प्रति किलो | बाजारभावा प्रमाणे अंदाजे किंमत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | तांदूळ | निरंक | २८१० | -२८१० | २० | ५६२०० |
| २ | गहू | ४४५० किलो | ५००६ | -५५६ | १८ | १०००८ |
| ३ | केरोसीन | ४५ लिटर्स | ४५ लिटर्स | निरंक | - | - |

याव्यतिरिक्त टेम्पो क्रमांक एमएच-४८-जी-२६०२ मध्ये आढळून आलेल्या टेम्पोमधील सरासरी ५० किलो भरतीच्या एकूण ५१ बाचक्यांमधील एकूण २५५० किलो गव्हाचा साठा आढळून आला. याबाबत होरीलाल माणिकचंद जैस्वाल यांचेकडे अधिकाऱ्यांनी विचारणा केली असता, अधिकृत शिधावाटप दुकान क्रमांक ४३-ग-१७४ ची माहे मार्च २०१३ ची गैरलाभार्थी गव्हाची ५००० किलो मागणी आहे. दिनांक १५/०३/२०१३ रोजी रात्री ८.०० वाजता मे. सुरज ग्रेन डिलर्स वेलफेअर असोसिएशनची ट्रक क्रमांक एमएच-११-एल-६४७४ या गाडीमधुन सुमारे एकूण ८५५० किलो गैरलाभार्थी गहू या दुकानात उतरवून घेतला. परंतु मे. सुरज ग्रेन डिलर्स वेलफेअर असोसिएशन यांनी फक्त ५००० किलो गैरलाभार्थी गव्हाचे दिनांक १५/०३/२०१३ रोजीचे बिल क्रमांक २३३, २३४, २३५ व २३६ दिले व मे. सुरज ग्रेन डिलर्स वेलफेअर असोसिएशनचे प्रतिनिधींनी त्याची ट्रॅकिंग शिटवर ५००० किलो गहू प्राप्त झाल्याची स्वाक्षरी घेतली. सदरचा अतिरिक्त साठा कांदिवली येथील अधिकृत शिधावाटप दुकान क्रमांक २८-ग-१२४ चे मालक व मे. सुरज ग्रेन डिलर्स वेलफेअर असोसिएशनचे पदाधिकारी व प्रतिनिधी जय मार्केंडेय सिंह यांनी दिल्याचे त्याने पंचांसमक्ष अधिकाऱ्यांना सांगितले. म्हणजेच दुकानदाराने दुकान क्रमांक २८-ग-१२४ चे मालक व मे. सुरज ग्रेन डिलर्स वेलफेअर असोसिएशनचे पदाधिकारी व प्रतिनिधी जय मार्केंडेय सिंह यांच्या संगनमताने सदर साठा अवैधरित्या साठा केल्याचे दिसुन येते. या साठ्यापैकी सुमारे २५५० किलो गहू खुल्या बाजारात विक्री करणेसाठी टेम्पो क्रमांक एमएच-४८-जी-२६०२ मधून बाहेर काढल्याचे सकृतदर्शनी आढळुन आले. सदरच्या टेम्पो व त्यामधील गव्हाचा साठा घटनास्थळी जप्त करण्यात आला. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे,

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण अंदाजे किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | टेम्पो क्रमांक एमएच-४८-जी-२६०२ | १ नग | ५,००,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | उक्त टेम्पोमधील ५१ बाचक्यांमधील गहू. | २५५० किलो | ४५,९००/- |
| | एकूण | | ५,४५,९००/- |

वरीलप्रमाणे टेम्पो व टेम्पोमधील गव्हाचा साठा हा अवैधरित्या खुल्या बाजारात काळ्याबाजारात विक्री करणेसाठी वरील टेम्पोमधुन बाहेर काढल्याचे सकृतदर्शनी आढळुन आल्याने सदरचा जप्त मुद्देमाल पोलिसांच्या ताब्यात देण्यासाठी सहाय्यक शिधावाटप अधिकारी श्री. राजेंद्र पाटील यांनी पोलिसांशी भ्रमणध्वनीवरुन पंचांसमक्ष संपर्क साधला व त्यांना घडलेल्या घटनाक्रमाची कल्पना देऊन घटनास्थळी पाचारण केले. त्यानुसार थोड्याव वेळात घटनास्थळी बोरिवली पोलिस ठाणेचे सहाय्यक पोलिस उपनिरिक्षक श्री कृष्णा रामा धादवड बक्कल क्रमांक १८७२०, पोलिस हवालदार श्री सुभाष लक्ष्मण भालगर बक्कल क्रमांक २१९८४ हे उपस्थित झाले.

दुकानातील साठ्याच्या तफावतीबाबत तसेच दुकानाबाहेर आढळुन आलेल्या टेम्पोमधील सरासरी ५० किलो भरतीच्या एकुण ५१ बाचक्यांमधील सुमारे २५५० किलो साठ्याबाबत दुकानात उपस्थित असलेल्या होरीलाल माणिकचंद जैस्वाल यांचेकडे विचारणा केली असता, दुकानातील एकुण साठ्यांपैकी सुमारे ३५०० किलो साठा हा मे. सुरज ग्रेन डिलर्स वेलफेअर असोसिएशन तसेच कांदिवली येथील अधिकृत शिधावाटप दुकान क्रमांक २८-ग-१२४ या दुकानाकरीता तसेच खुल्या बाजारात विक्री करण्याकरीता माल बाहेर काढुन टेम्पो क्रमांक एमएच-४८-जी-२६०२ मध्ये भरुन चालला होता असे सांगितले. शासन अनुदानित गव्हाचा अधिकृत शिधावाटप दुकान क्रमांक ४३-ग-१७४ मध्ये आवक झालेला साठा पांढऱ्या रंगाच्या रिकाम्या बाचक्यांमध्ये पलटी करुन तो माल त्यानेच भाड्याने घेतलेल्या टेम्पो क्रमांक एमएच-४८-जी-२६०२ मध्ये भरुन खुल्या बाजारात काळ्याबाजाराने विक्री करणेकरीता पाठवित असताना, खबरीने तो टेम्पो अडविल्याचे होरीलाल माणिकचंद जैस्वाल यांनी पंचांसमक्ष मान्य केले. तसेच दुकानामध्ये अधिकाऱ्यांना आढळुन आलेल्या १०० रिकाम्या पांढऱ्या रंगाच्या गोण्या त्याने वरील प्रमाणे गैरव्यवहार करणेसाठीच दुकानात आणुन ठेवल्याचे पंचांसमक्ष अधिकाऱ्यांना सांगितले.

तसेच अन्न महामंडळाच्या सुमारे ८० बाचक्यांमधील गहू काल व आज दुकानात रिकामा करुन तो पांढऱ्या रंगाच्या ५१ गोण्यांमध्ये भरला व अन्न महामंडळाच्या रिकाम्या ८० गोण्या मागाठाणे बस स्थानकाजवळील गोणी विक्रेत्याला प्रति गोणी रु ९ ते १० या दराने आज दिनांक १६/०३/२०१३ रोजी दुपारी प्रत्यक्ष दुकानात बोलावून विकल्याचे अधिकाऱ्यांना पंचांसमक्ष सांगितले.

तसेच दुकानांत तांदळाचा प्रत्यक्ष साठा आढळुन आला नाही. तथापी साठा पुस्तकात एकुण २८१० किलो तांदाळाचा साठा दिनांक १६/०३/२०१३ रोजी शिल्लक असल्याचे दिसुन आले. या तफावतीबाबत विचारणा केली असता, दुकानदाराचे प्रतिनिधी होरालाल माणिकचंद जैस्वाल यांनी साठा हा मे. सुरज ग्रेन डिलर्स वेलफेअर असोसिएशन तसेच कांदिवली येथील अधिकृत शिधावाटप दुकान क्रमांक २८-ग-१२४ या दुकानाकरीता तसेच

खुल्या बाजारात विक्री करण्याकरीता माल बाहेर काढुन दिनांक १५/०३/२०१३ रोजी दुपारी १.०० वाजता पाठविल्याचे पंचांसमक्ष अधिकाऱ्यांना सांगितले.

अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष घेतलेल्या संपूर्ण तपासणीमध्ये खालीलप्रमाणे त्रुटी व दोष आढळुन आले.

(१) तपासणीवेळी प्राधिकारपत्रधारक श्रीमती शारदा अशोक जैस्वाल या दुकानात गैरहजर होत्या. तसेच दुकानातील उपस्थित होरीलाल माणिकचंद जैस्वाल यांच्या दुकानातील उपस्थितीबाबत कोणतेही अधिकृत कागदपत्र उपलब्ध नव्हते. (२) शिधाजिन्नसांचे नमूने दर्शनी भागी ठेवलेले नव्हते. (३) नियतकालिक विवरणपत्रे कार्यालयास सादर केलेले नव्हते. (४) केरोसीन मापांचे वजनमापे पडताळणी प्रमाणपत्र उपलब्ध नव्हते. (५) साठापुस्तकात खाडाखोड व सफेद शाईचा वापर केल्याचे आढळले. (६) गैरलाभार्थी तांदळाचा साठा २८१० किलो उपलब्ध असणे आवश्यक असतानाही साठा निरंक आढळुन आला. (७) गैरलाभार्थी गव्हाचा साठा ५००६ किलो उपलब्ध असणे आवश्यक असतानाही साठा ५५६ किलोने कमी आढळुन आला. (८) अन्नधान्याच्या मागणीपत्रावर आवक साठ्याची नोंद घेताना त्यावर कंत्राटदाराची अथवा संबंधित वाहनचालकाची स्वाक्षरी नाही. (९) बिलानुसार दिनांक २४/०१/२०१३ रोजी झालेली केरोसीनची ३०० लिटर्स आवक साठापुस्तकात दिनांक २८/०१/२०१३ रोजी दर्शविण्यात आली आहे. (१०) बिल क्रमांक १७०५ मे. आरती केरोसीन एजन्सी नुसार दिनांक ०९/०३/२०१३ रोजी झालेली केरोसीनची ३०० लिटर्स आवक साठापुस्तकात दिनांक ०६/०३/२०१३ रोजी म्हणजेच ३ दिवस अगोदर दर्शविण्यात आली आहे. (११) दिनांक २१/०१/२०१३ ते ३१/०१/२०१३ या कालावधीतील ८०० किलो गव्हाच्या विक्रीवरील २० किलो घट अनुज्ञेय मर्यादेपेक्षा जास्त आढळली. (१२) दिनांक १६/०२/२०१३ ते २८/०२/२०१३ या कालावधीतील ३७३ लिटर्स केरोसीन विक्रीवरील ७ लिटर्स घट अनुज्ञेय मर्यादेपेक्षा जास्त आढळली.

अधिकाऱ्यांनी केलेल्या चौकशीस अनुसरुन व दुकानाच्या घेतलेल्या तपासणीनुसार होरीलाल माणिकचंद जैस्वाल यांचा लेखी जबाब पंचांसमक्ष नोंदवून घेतला.

सदर दुकानाच्या तपासणी कामात अधिकारी व्यस्त असताना मे. सुरज ग्रेन डिलर्स वेलफेअर असोसिएशन या संलग्न संस्थेचे प्रतिनिधी जय मार्कडेय सिंग याचा जबाब घेण्यात आला. जबाबावर स्वाक्षरी करा असे सांगितले असता, लघुशंकेचे निमित्त सांगून त्यांनी घटनास्थळावरुन पोबारा केला. त्यामुळे त्यांच्या लेखी जबाबावर स्वाक्षरी घेता आली नाही. तसेच सहाय्यक शिधावाटप अधिकारी राजेंद्र पाटील यांनी मे. सुरज ग्रेन डिलर्स वेलफेअर असोसिएशनचे बिलांवर नमूद भ्रमणध्वनी क्रमांक ९७६९३३२३१२ वर वारंवार संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. परंतु प्रतिसाद मिळाला नाही. अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष अधिकृत शिधावाटप दुकान क्रमांक ४३-ग-१७४ उपस्थित असलेले होरीलाल माणिकचंद जैस्वाल यांना वारंवार प्राधिकारपत्रधारक श्रीमती शारदा जैस्वाल यांना दुकानात उपस्थित राहणेबाबत सूचित केले. परंतू त्यास होरीलाल माणिकचंद जैस्वाल यांनी प्रतिसाद दिला नाही. म्हणजेच

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES

त्यामध्ये त्यांचा गैरहेतू असल्याचे अधिकाऱ्यांना पंचांसमक्ष आढळले. सबब अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष व उपस्थित पोलिस अधिकाऱ्यांसमक्ष सदरचे अधिकृत शिधावाटप दुकान क्रमांक ४३-ग-१७४ हे शासनाच्या शिक्क्यानिशी दुकानात असलेल्या मुद्देमालासहीत सिलबंद करण्यात आले. तसेच दुकानापासुन फर्लांगभर अंतरावर असलेल्या टेम्पो क्रमांक एमएच-४८-जी-२६०२ व त्यातील ५१ बाचक्यांमधील सुमारे गव्हाचा २५५० किलो अंदाजित किंमत अनुक्रमे रक्कम रुपये ५,००,०००/- व रुपये ४५,९००/- असा एकूण रुपये ५,४५,९००/- किंमतीचा मुद्देमाल घटनास्थळी जप्त करुन पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला.

तद्नंतर अधिकाऱ्यांनी दुसरे पथक अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २८-ग-१२४ या कांदिवली येथील दुकानाची संपूर्ण तपासणी घेतली असता, तपासणीच्या वेळी प्राधिकारपत्रधारक जय मार्कंडे सिंह उपस्थित नव्हते. सदर तपासणीच्या वेळी गैरलाभार्थी तांदळाचा २६८०.३०० किलो, गव्हाचा ३१७६.९७५ किलो व केरोसिनचा २०३ लिटर साठा हा प्रत्यक्षात कमी आढळून आल्याने अधिकृत शिधावाटप दुकान क्रमांक २८-ग-१२४ चे प्राधिकारपत्रधारक तथा मे. सुरज ग्रेन वेलफेअर्स डिलर्स असोसिएशनचे प्रतिनिधी जय मार्कंडे सिंह तसेच राहुल होरीलाल जयसवाल व मे. सुरज ग्रेन वेलफेअर्स डिलर्स असोसिएशन या संघटीत संस्थेचे अधिकृत एजन्ट (अभिकर्ता) नामे इंद्रसेन सिंग, चेअरमन व हरेंद्र सिंग, सचिव यांनी संगनमताने शासनकृत प्राधिकारपत्राचा गैरवापर करुन अनधिकृत व्यवसायासाठी शासन अनुदानित शिधाजिन्नसांची अवैध विक्री करुन शासनाची पर्यायाने पात्र शिधापत्रिकाधारकांची फसवणूक केल्याचे सिध्द झाल्याने संबंधितांविरुध्द (१) जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ चे कलम ३, ७, ८, ९ व १० (२) दि महाराष्ट्र अन्नधान्य आदेश, १९६६ मधील तरतूदी, (३) महाराष्ट्र अन्नधान्य (द्वितीय) आदेश, १९६६ चे कलम ८, (४) मुंबई रेशनिंग एरिया शेड्युल्ड कमोडीटीज (रेग्युलेशन ऑफ डिस्ट्रीब्युशन) ऑर्डर, १९८६ चे कलम ८ तसेच (५) दि महाराष्ट्र केरोसीन डिलर्स लायसंन्सिंग ऑर्डर, १९६६ चे कलम ३ चा भंग केल्याने त्यांचेविरुध्द कांदिवली पोलिस ठाणे, मुंबई येथे वि.स्था.गु.क्र. २६/२०१३, दिनांक १७/०३/२०१३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

अशाप्रकारे आकाश प्रोव्हीजन एण्ड जनरल स्टोर, अधिकृत शिधावाटप दुकान क्रमांक ४३-ग-१७४ या अधिकृत शिधावाटप दुकानाच्या प्राधिकारपत्रधारक श्रीमती शारदा अशोक जैस्वाल व त्यांचे मदतनीस होरीलाल माणिकचंद जैस्वाल आणि दुकान क्रमांक २८-ग-१२४ चे मालक व मे. सुरज ग्रेन डिलर्स वेलफेअर असोसिएशनचे पदाधिकारी व प्रतिनिधी जय मार्केडेय सिंह यांनी शासन अनुदानित गव्हाचा दुकानात आवक झालेला साठा स्वत:चे वैयक्तिक फायद्यासाठी व नफा कमविण्यासाठी खुल्या बाजारामध्ये काळ्याबाजाराने अवैध विक्री करीता नेत असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येत आहे. त्याचप्रमाणे टेम्पो क्रमांक एमएच-४८-जी-२६०२ चे मालक व चालक यांनी या अनधिकृत व्यवसायासाठी त्यांना मदत केल्याचे स्पष्ट झाले आहे. उपरोक्त सर्व संबंधितांनी शासन

अनुदानित शिधाजिन्नसांची अवैध विक्री करुन आपआपसात संगनमत करुन शासनाची, पर्यायाने गोरगरीब जनतेची फसवणूक केल्याचे सिद्ध झाल्याने संबंधिताविरुद्ध (१) जीवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८, ९ व १० (२) महाराष्ट्र अन्नधान्य आदेश, १९६६ तसेच (३) महाराष्ट्र फुडग्रेन्स रेशनिंग (सेकंड) ऑर्डर, १९६६ चा भंग केल्याने त्यांचेविरुद्ध बोरिवली पोलिस ठाणे, मुंबई येथे वि.स्था.गु.क्र. १८/२०१३, दिनांक १६/०३/२०१३ अन्वये गुन्हा नोंद करुन वरील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमलबजावणी), मुंबई यांनी केलेली असून, जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक २३/०४/२०१३ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली होती.

उपरोक्त वस्तुस्थिती पाहता, प्रस्तुत प्रकरणी सुनावणी होऊन सर्व संबंधितांचे म्हणणे ऐकून घेवून अंतिम निकालपत्र देण्यास विलंब लागणार असल्याने व प्रस्तुत प्रकरणी जप्त करण्यात आलेला शासन नियंत्रित दराचा गहू हा पदार्थ नाशवंत असल्याने सदरचा पदार्थ आणखी काही काळ तसाच राहील्यास सदरचा गहू खराब होऊन शासनाचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचप्रमाणे शासन निर्णय क्र. ईसीए-१००९/प्र.क्र.३९९/ना.पु.२३, दि. १३ मे, २०१० अन्वये जप्त करण्यात आलेला गहू, तांदूळ, तुरदाळ, साखर व पामतेल या जीवनावश्यक वस्तू, जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६ (अ) चे पोट कलम २ मधील तरतूदीनुसार शिधावाटप दुकानदारांना द्यावेत व शिधावाटप दुकानदारांनी सदरच्या वस्तू शासननियंत्रित दराने पात्र शिधापत्रिकाधारकांना वितरीत करावे असे निर्देश देण्यात आले आहेत. सबब, प्रस्तुत प्रकरणी जप्त करण्यात आलेल्या गव्हाच्या साठ्याबाबत नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्याच्या तपासाच्या तसेच सदर प्रकरणी नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्याच्या अधिन राहून वाचावे क्र. ३ अन्वये अंतरीम आदेश पारीत करण्यात आले.

दिनांक २३/०४/२०१३ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहीले नाहीत. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक ०९/०५/२०१३ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ०९/०५/२०१३ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस उपनिरीक्षक, बोरीवली पोलिस ठाणे, मुंबई यांनी उपस्थित राहून वाचावे क्र. ४ अन्वये लेखी अभिवेदन सादर केले. तथापी, सदर सुनावणीही आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहिले नाहीत. सर्व संबंधितांना त्यांचे लेखी अथवा मौखिक

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
FICE

0008

म्हणणे मांडण्यासाठी पुरेशी संधी देण्यात आली असून ते सुनावणीसही उपस्थित राहिले नाहीत. अथवा त्यांनी त्यांचे लेखी म्हणणेही सादर केले नाही. यावरुन त्यांना काहीही सांगावयाचे नसल्याचे दिसून येते.

सबब, प्रकरण गुणवत्तेवर एकतर्फी निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

## युक्तिवाद :-

दिनांक ०९/०५/२०१३ रोजीच्या सुनावणीस उपस्थित तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस उपनिरीक्षक, बोरीवली पोलिस ठाणे, मुंबई यांनी वरिष्ठ पोलिस निरिक्षक, बोरीवली पोलिस ठाणे, मुंबई यांचे सादर केलेल्या अभिवेदनात, नमुद गुन्ह्यात फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार आतापर्यंत १) हारीलाल माणिकलाल जैस्वाल व शत्रुघन लालजी कुशवह, चालक या नमुद इसमांना अटक करण्यात आली आहे. नमुद सर्व अटक आरोपीत इसमाची मा. न्यायालयाने जामिनावर मुक्तता केलेली आहे. तसेच १) श्रीमती शारदा अशोक जैस्वाल, २) जय मार्केडे सिंग, ३) मे. सुरज ग्रेन डिलर्स असो. चेअरमन इंद्रसेन सिंग, ४) मे. सुरज ग्रेन डिलर्स असो. चे सचिव हरेंद्र सिंग, ५) टेम्पो क्र. एमएच-४८-जी-२६०२ मालक व ६) मे. सुरज ग्रेन डिलर्स असो. चे प्रतिनिधी राहुल जयस्वाल हे नमुद गुन्ह्यात पाहिजे आरोपी आहेत. सदरचा जप्त केलेला गहू व टेम्पो पंचनामा करुन ताब्यात घेऊन त्याची नोंद भादवि मुद्देमाल नोंदवहित दिनांक १७.०३.१३ अन्वये नोंद घेण्यात आली आहे. सदर गुन्ह्यात जप्त करण्यात आलेला टेम्पो अद्याप पोलिस ठाण्याच्या आवारात उभा आहे. सदर टेम्पोबाबत आपले स्पष्ट आदेश होणेस विनंती आहे, असे नमूद केले आहे.

## निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील पोलिसांचे अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, दिनांक १६/०३/२०१३ रोजी या कार्यालयास अधिकृत शिधावाटप दुकान क्रमांक ४३-ग-१७४ या दुकानातुन शासन अनुदानित गहू अवैधरीत्या खुल्या बाजारात काळ्याबाजाराने विक्री करणेकरीता पाठविला जात आहे अशा मिळालेल्या खबरीच्या अनुषंगाने या कार्यालयातील फिरत्या पथकातील अधिकारी/ कर्मचारी यांनी पंचांसह आकाश प्रोव्हीजन एण्ड जनरल स्टोर, शॉप नं. १३, व्हिनस अपार्टमेंट, सिद्धीविनायक कॉम्पलेक्स, चिकूवाडी, शिंपोली, बोरिवली (प.), मुंबई ४०० ०९२ अधिकृत शिधावाटप दुकान क्रमांक ४३-ग-१७४ तपासणी घेतली. तसेच अधिकाऱ्यांनी दुसरे पथक अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २८-ग-१२४ या कांदिवली येथील

CONTROLLER OF RATIONING ... HEAD

दुकानाची संपूर्ण तपासणी घेतली असता, सदर तपासणीच्या वेळी गैरलाभार्थी तांदळाचा २६८०.३०० किलो, गव्हाचा ३१७६.९७५ किलो व केरोसिनचा २०३ लिटर साठा हा प्रत्यक्षात कमी आढळून आल्याने अधिकृत शिधावाटप दुकान क्रमांक २८-ग-१२४ चे प्राधिकारपत्रधारक तथा मे. सुरज ग्रेन वेलफेअर्स डिलर्स असोसिएशनचे प्रतिनिधी जय मार्कंडे सिंह तसेच राहुल होरीलाल जयसवाल व मे. सुरज ग्रेन वेलफेअर्स डिलर्स असोसिएशन या संघटीत संस्थेचे अधिकृत एजन्ट (अभिकर्ता) नामे इंद्रसेन सिंग, चेअरमन व हरेंद्र सिंग, सचिव यांनी संगनमताने शासनकृत प्राधिकारपत्राचा गैरवापर करुन अनधिकृत व्यवसायासाठी शासन अनुदानित शिधाजिन्नसांची अवैध विक्री करुन शासनाची पर्यायाने पात्र शिधापत्रिकाधारकांची फसवणूक केल्याचे सिध्द झाल्याने संबंधितांविरुध्द कांदिवली पोलिस ठाणे, मुंबई येथे वि.स्था.गु.क्र. २६/२०१३, दिनांक १७/०३/२०१३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तसेच आकाश प्रोव्हीजन एण्ड जनरल स्टोर, अधिकृत शिधावाटप दुकान क्रमांक ४३-ग-१७४ या अधिकृत शिधावाटप दुकानांच्या प्राधिकारपत्रधारक श्रीमती शारदा अशोक जैस्वाल व त्यांचे मदतनीस होरीलाल माणिकचंद जैस्वाल आणि दुकान क्रमांक २८-ग-१२४ चे मालक व मे. सुरज ग्रेन डिलर्स वेलफेअर असोसिएशनचे पदाधिकारी व प्रतिनिधी जय मार्केडेय सिंह यांनी शासन अनुदानित गव्हाचा दुकानात आवक झालेला साठा स्वत:चे वैयक्तिक फायद्यासाठी व नफा कमविण्यासाठी खुल्या बाजारामध्ये काळ्याबाजाराने अवैध विक्री करीता नेत असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येत आहे. त्याचप्रमाणे टेम्पो क्रमांक एमएच-४८-जी-२६०२ चे मालक व चालक यांनी या अनधिकृत व्यवसायासाठी त्यांना मदत केल्याचे स्पष्ट झाल्याने सर्व संबंधितांनी शासन अनुदानित शिधाजिन्नसांची अवैध विक्री करुन आपआपसात संगनमत करुन शासनाची, पर्यायाने गोरगरीब जनतेची फसवणूक केल्याचे सिद्ध झाल्याने संबंधिताविरुद्ध बोरिवली पोलिस ठाणे, मुंबई येथे वि.स्था.गु.क्र. १८/२०१३, दिनांक १६/०३/२०१३ अन्वये गुन्हा नोंद करुन टेम्पो क्रमांक एमएच-४८-जी-२६०२ व सदर टेम्पोमधील ५१ बाचक्यांमधील गहू असा एकूण ५,४५,९००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

प्रस्तूत प्रकरणी, अ.शि.दु.क्र. ४३-ग-१७४ चे प्राधिकारपत्रधारक श्रीमती शारदा अशोक जैस्वाल, अ.शि.दु.क्र. २८-ग-१२४ चे प्राधिकारपत्रधारक तथा मे. सुरज ग्रेन डिलर्स वेलफेअर्स असोसिएशनचे प्रतिनिधी जय मार्कंडे सिंह, मे. सुरज ग्रेन डिलर्स वेलफेअर्स असोसिएशनचे प्रतिनिधी राहुल होरीलाल जयसवाल, मे. सुरज ग्रेन डिलर्स वेलफेअर्स असोसिएशनचे चेअरमन इंद्रसेन सिंग, मे. सुरज ग्रेन डिलर्स वेलफेअर्स असोसिएशनचे सचिव हरेंद्र सिंग, होरीलाल माणिकचंद जयसवाल, टेम्पो क्रमांक एमएच-४८-जी-२६०२ चा मालक व टेम्पो क्रमांक एमएच-४८-जी-२६०२ चा चालक यांना त्यांचे म्हणणे सादर करण्याकरीता पुरेशी संधी देवून देखील ते सुनावणीस उपस्थित राहीले नाहीत. अथवा त्यांनी त्यांचे लेखी म्हणणे सादर केले नाही. यावरुन आरोपी/अपचारी यांना

याबाबत काहीही सांगावयाचे नसल्याचे आणि कोणताही खुलासा करावयाचा नसल्याचे तसेच जप्त मुद्देमाल परत मिळण्यासंदर्भात कसलेही स्वारस्य नसल्याचे व नोटीसीतील आरोप मान्य असल्याचे दिसून येते.

प्रस्तूत प्रकरणी, घटनास्थळी टेम्पो क्रमांक एमएच-४८-जी-२६०२ मध्ये आढळून आलेल्या सरासरी ५० किलो भरतीच्या एकूण ५१ बाचक्यांमधील एकूण २५५० किलो गव्हाचा साठ्याबाबत होरीलाल माणिकचंद जैस्वाल यांचेकडे अधिकाऱ्यांनी विचारणा केली असता, अधिकृत शिधावाटप दुकान क्रमांक ४३-ग-१७४ ची माहे मार्च २०१३ ची गैरलाभार्थी गव्हाची ५००० किलो मागणी केली असल्याचे सांगितले. त्याअनुषंगाने दिनांक १५/०३/२०१३ रोजी रात्री ८.०० वाजता मे. सुरज ग्रेन डिलर्स वेलफेअर असोसिएशनची ट्रक क्रमांक एमएच-११-एल-६४७४ या गाडीमधुन सुमारे एकूण ८५५० किलो गैरलाभार्थी गहू या दुकानात उतरवून घेतला. परंतु मे. सुरज ग्रेन डिलर्स वेलफेअर असोसिएशन यांनी फक्त ५००० किलो गैरलाभार्थी गव्हाचे दिनांक १५/०३/२०१३ रोजीचे बिल क्रमांक २३३, २३४, २३५ व २३६ दिले व मे. सुरज ग्रेन डिलर्स वेलफेअर असोसिएशनचे प्रतिनिधींनी त्याची ट्रॅकिंग शिटवर ५००० किलो गहू प्राप्त झाल्याची स्वाक्षरी घेतली. यावरुन सदरचा अतिरिक्त ३५५० किलो गव्हाचा साठा कांदिवली येथील अधिकृत शिधावाटप दुकान क्रमांक २८-ग-१२४ चे मालक व मे. सुरज ग्रेन डिलर्स वेलफेअर असोसिएशनचे पदाधिकारी व प्रतिनिधी जय मार्कंडेय सिंह यांनी काळाबाजारीने विक्री केल्याचे सिध्द होत आहे. म्हणजेच दुकानदाराने दुकान क्रमांक २८-ग-१२४ चे मालक व मे. सुरज ग्रेन डिलर्स वेलफेअर असोसिएशनचे पदाधिकारी व प्रतिनिधी जय मार्कंडेय सिंह यांनी संगनमताने सदर साठा अवैधरित्या प्राप्त करुन अवैध विक्रीकरीता साठवणूक केल्याचे दिसुन येते. सदर साठ्यापैकी सुमारे २५५० किलो गव्हाचा साठा हा टेम्पो क्रमांक एमएच-४८-जी-२६०२ मधून खुल्या बाजारात विक्री करणेसाठी घेऊन जात असताना पथकाने रंगेहात पकडल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. सदर गुन्हा नोंद प्रकरणी आकाश प्रोव्हीजन एण्ड जनरल स्टोर, अधिकृत शिधावाटप दुकान क्रमांक ४३-ग-१७४ या अधिकृत शिधावाटप दुकानाच्या प्राधिकारपत्रधारक श्रीमती शारदा अशोक जैस्वाल व त्यांचे मदतनीस होरीलाल माणिकचंद जैस्वाल आणि दुकान क्रमांक २८-ग-१२४ चे मालक तथा मे. सुरज ग्रेन डिलर्स वेलफेअर असोसिएशनचे पदाधिकारी व प्रतिनिधी जय मार्कंडेय सिंह तसेच मे. सुरज ग्रेन डिलर्स वेलफेअर असोसिएशनचे सर्व संबंधितांना शासनाच्या वतीने शिधापत्रिकाधारकास अथवा अधिकृत शिधावाटप दुकानास ठरीव परिमाणात शासन अनुदानित अन्नधान्याचा साठा वितरण करण्यासाठी प्राधिकारपत्रधारक म्हणून नेमणूक केले असताना त्यांनी त्यांच्या ताब्यात असलेल्या अन्नधान्याची संगणमताने काळाबाजारी करुन प्राधिकारपत्रधारक म्हणून शासनाची विश्वासार्हता गमावल्याचे निष्पन्न होत आहे. सबब, जप्त गव्हाच्या साठ्यासंदर्भात पारीत करण्यात आलेले दिनांक ०५/०४/२०१३ रोजीचे अंतरीम आदेश कायम करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

CONTROLLER OF RATIONING & ... HEAD O... MUMB...

तसेच, टेम्पो क्रमांक एमएच-४८-जी-२६०२ चे मालक/चालक यांनी शासन नियंत्रित गव्हाच्या साठ्याची त्यांच्या टेम्पोमध्ये अवैध वाहतूक करुन नमूद गुन्ह्यातील इतर आरोपीतांना सदरच्या अवैध व्यवसायामध्ये प्रोत्साहन दिल्याचे सकृतदर्शनी दिसून येत असल्याने त्यांचा नमूद गुन्ह्यात प्रत्यक्ष सहभाग असल्याचे निष्पन्न होतं असून आरोपीतांनी सदर टेम्पोचा गैरवापर केला असल्याचे स्पष्ट होते. सबब, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ)(क) मधील तरतुदीनुसार सदरचा जप्त करण्यात आलेला टेम्पो क्रमांक एमएच-४८-जी-२६०२ हा त्याच्या बाजारमुल्या एवढी संपुर्ण रक्कम भरण्यास टेम्पोचा मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचा टेम्पो त्याच्या मालकास परत करण्याच्या अथवा टेम्पोचे मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या टेम्पोची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे. तथापी, टेम्पोच्या मालकीबाबत कोणताही कायदेशीर पुरावा सादर न केल्याने अशी कार्यवाही करण्यापूर्वी टेम्पोच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये बोरिवली पोलिस ठाणे, मुंबई येथे वि.स्था.गु.क्र. १८/२०१३, दिनांक १६/०३/२०१३ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

**आदेश :-**

१) या कार्यालयाचे दिनांक ०५/०४/२०१३ रोजीचे अंतरीम आदेश या आदेशान्वये कायम करण्यात येत आहेत.

२) जप्त करण्यात आलेला टेम्पो क्रमांक एमएच-४८-जी-२६०२ हा शासनजमा करण्यात येत आहे. सदर टेम्पोची बाजारमुल्या एवढी रक्कम भरण्यास टेम्पोचा मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचा टेम्पो त्याच्या मालकास परत करण्यात यावा व सदर रक्कम शासनजमा करावी. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी टेम्पोच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

३) अथवा टेम्पोचा मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या टेम्पोची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरचा टेम्पो लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

0012

वरीलप्रमाणे ज़प्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) अ.शि.दु.क्र. ४३-ग-१७४ चे प्राधिकारपत्रधारक श्रीमती शारदा अशोक जैस्वाल
२) अ.शि.दु.क्र. २८-ग-१२४ चे प्राधिकारपत्रधारक तथा मे. सुरज ग्रेन डिंलर्स वेलफेअर्स असोसिएशनचे प्रतिनिधी जय मार्कंड सिंह
३) मे. सुरज ग्रेन डिलर्स वेलफेअर्स असोसिएशनचे प्रतिनिधी राहुल होरीलाल जयसवाल
४) मे. सुरज ग्रेन डिलर्स वेलफेअर्स असोसिएशनचे चेअरमन इंद्रसेन सिंग
५) मे. सुरज ग्रेन डिलर्स वेलफेअर्स असोसिएशनचे सचिव हरेंद्र सिंग
६) होरीलाल माणिकचंद जयसवाल
७) टेम्पो क्रमांक एमएच-४८-जी-२६०२ चा मालक
८) टेम्पो क्रमांक एमएच-४८-जी-२६०२ चा चालक
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, बोरीवली पोलिस ठाणे, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, बोरीवली पोलिस ठाणे, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल सात दिवसात या कार्यालयास सादर करावा.
२) उपनियंत्रक शिधावाटप, ग परिमंडळ, कांदिवली यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
३) कार्यासन अधिकारी, मागणी शाखा, का.क्र. ०२, प्रधान कार्यालय यांना माहितीकरीता.
४) कार्यासन अधिकारी, दुकान शाखा, का.क्र. १०, प्रधान कार्यालय यांना माहितीकरीता.
५) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, का.क्र. ५, प्रधान कार्यालय यांना माहितीकरीता.
६) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
७) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

D:\user E\Amaldata-2013\Ammal Aadesh\Aadesh.doc